नवराष्ट्र



# रामदेवबाबा विद्यापीठाचे चार विद्यार्थी बनले 'सायबर वॉरियर'

**नागपूर.** रामदेवबाबा विद्यापीठाचे चार विद्यार्थी क्विक हील फाउंडेशनसह 'सायबर शिक्षा, सायबर सुरक्षा' उपक्रमात भाग घेऊन 'सायबर वॉरियर' बनले आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम पुणेच्या विमाननगरातील क्विक हील कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. रामदेवबाबा विद्यापीठाचे कम्प्यूटर सायन्स ॲण्ड अप्लिकेशन विभागाचे प्रमुख डॉ प्रीती वोडिटेल, प्रो. पुनम खंडारे आणि डॉ. सत्यजित उपरकर यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थी राज पांडे, रिया सक्सेना, प्रतीक आमनेरकर, सीया ठाकूर यांनी हे प्रशिक्षण घेतले.

रामदेवबाबा विद्यापीठ आणि क्विक हिल फाउंडेशनमध्ये झालेल्या या भागीदारीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासह भविष्यात सुरक्षित डिजिटल व्यवहार करण्यास मदत मिळेल. रामदेवबाबा विद्यापीठाचे व्यवस्थापन, कुलपती डॉ. एस. एस. मंथा, कुलगुरू डॉ. आर. एस. पांडे आणि कंप्यूटर सायन्स ॲण्ड इंजीनिअरिंगचे संचालक डॉ. उर्मिला श्रावणकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

Orange City Plus Edition
Jun 22, 2024 Page No. 5
Powered by: erelego.com